# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे - ४११ ००१

फोन नं (०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी – sceapune@gmail.com

जा.क्र. रासनिप्रा/कक्ष-३अ/ निवडणूक/ क व ड वर्ग/तालिका मार्गदर्शक सूचना/--------/२०१९ दि. /१२/२०१९

8339 2 DEC 2019

प्रति,
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी
तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व),

**विषय :- "क" व "ड" वर्गातील सहकारी संस्थांचे निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांची नामतालिका तयार करण्यासाठी अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबतच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना.**

**संदर्भ** :- १. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४, नियम ७५.
२.प्राधिकरणाकडील पत्र जा.क्र.रासनिप्रा/कक्ष -५/ निनिअ नियुक्ती निकष/परिपत्रक/३४२९/ २०१९ दि. २८.०३.२०१९ चे शुध्दीपत्रक.
३.महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) (प्रथम सुधारणा) नियम २०१९, नियम ७५

२/- राज्यातील सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाच्या नियमीत निवडणूका, संचालक मंडळाच्या रिक्त पदांच्या निवडणूका व पदाधिकाऱ्यांच्या निवडणूका घेण्याची जबाबदारी व अधिकार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३कब अन्वये राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास निहीत केलेले आहेत. सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ अंमलात आले आहेत. सदरच्या निवडणूक नियमातील नियम ४ अन्वये, निवडणूकीचे प्रयोजनार्थ 'अ', 'ब', 'क' व 'ड' असे सहकारी संस्थांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. 'क' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासंबंधी निवडणूक नियमातील नियम ७५ अन्वये तरतुद करण्यात आली आहे. 'क' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूकीसाठी जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी तयार केलेल्या व राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने मान्य केलेल्या तालिकेवरील किंवा नियम ३ खंड (१) प्रमाणे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नेमणूक करेल आणि संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी हे तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांचे मान्यतेने लवकरात लवकर निवडणूक कार्यक्रम जाहिर करतील अशी तरतूद आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ मधील नियम ७६ प्रमाणे "ड" वर्गाच्या सहकारी संस्थांचे निवडणूकांकरीतादेखील राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण प्राधिकृत अधिकाऱ्यांची (Authorised Officer) नेमणूक करेल अशी तरतूद आहे.

त्याअनुषंगाने राज्यातील प्रत्येक जिल्हयातील 'क' व 'ड' वर्गीकरणाच्या सहकारी संस्थांचे निवडणूकी करीता सहकारी संस्थांचे निवडणूक निर्णय अधिकारी यांची नामतालिका जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी तयार करावयाची आहे. (यामध्ये २५० किंवा २५० पेक्षा कमी सभासद असणा-या सहकारी गृहनिर्माण संस्थांचा समावेश नाही.) त्यासाठी अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबतच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना खालील प्रमाणे आहेत.

१. 'क' व 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांची नामतालिका तयार करण्याकरीता जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था / सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांचे अध्यक्षतेखाली एकूण ३ सदस्यांचे छाननी समितीचे गठन करण्यात यावे. सदर समितीमध्ये दोन सहाय्यक / उपनिबंधक सहकारी संस्था यांचा समावेश करण्यात यावा. जिसनिअ कार्यालयातील निवडणूकविषयक कामकाज पाहणारे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था हे सदर समितीचे सदस्य सचिव असतील.

२. सहकार खात्यातील कार्यरत अधिकारी / कर्मचारी :- प्राधिकरणाने निर्गमित केलेले परिपत्रक जा.क्र. ३४२९/२०१९ दि. २८.०३.२०१९ प्रमाणे 'क' व 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांचा सदर नामतालिकेत समावेश असावा. त्यांचेकडून स्वतंत्र अर्ज मागविण्याची आवश्यकता नाही.

३. इतर शासकीय विभागातील किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेमधील कार्यरत अधिकारी / कर्मचारी :- वरीष्ठ लिपीक व त्या पेक्षा जादा दर्जा असलेला कर्मचारी यांचा नामतालिकेत समावेश असावा.

४. प्रमाणित लेखापरिक्षक :- प्रमाणित लेखापरिक्षक हा मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या नामतालिकेवरील नोंदणीकृत व कार्यरत प्रमाणीत लेखापरीक्षक असावा.

५. वकील :- वकीलीची सनद प्राप्त झाल्यापासून वकील म्हणून प्रत्यक्षात किमान ५ वर्षे कामकाज केल्याचा अनुभव असलेले वकील यांचा समावेश सदरच्या नामतालिकेत करावा.

६. कोणत्याही शासकीय विभागातुन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेमधून सेवानिवृत्त झालेले / सहकारी संस्थांमधून सेवानिवृत्त झालेले अधिकारी / कर्मचारी :- वरीष्ठ लिपीक व त्या पेक्षा जादा दर्जा असलेला सेवा निवृत्त अधिकारी / कर्मचारी यांचा तालिकेत समावेश असावा. सर्वसाधारण पणे वय वर्षे ६५ पेक्षा जादा नसावे.

७. सहकारी संस्थेतील कार्यरत अधिकारी / कर्मचारी :- सहकारी संस्थेतील अधिकारी / कर्मचारी म्हणून ५ वर्षे सेवा केलेली असावी. तसेच वरीष्ठ लिपीक व त्या पेक्षा जादा दर्जा असलेले अधिकारी/ कर्मचारी यांचा समावेश तालिकेत करावा.

८. प्राधीकरणाने यापूर्वी तयार केलेल्या नामतालिकेवरून कामचुकारपणा/कर्तव्यात कसूर किंवा अन्य तत्सम कारणामुळे नामतालिकेवरून काढून टाकण्यात आलेली कोणतीही व्यक्ती सदर नामतालिकेकरीता पात्र असणार नाही.

९. प्राधिकरणाने विहित केलेल्या नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घेऊन ते आवश्यक त्या माहितीसह परिपूर्ण भरून आणि त्यासोबत आवश्यक ते स्वसाक्षांकीत छायांकीत पुरावे जोडून विहीत मुदतीमध्ये सादर करणे अनिवार्य राहील. विहीत मुदतीमध्ये प्राप्त झालेले परिपूर्ण अर्जच नामतालिका तयार करण्याचे प्रयोजनार्थ विचारात घेण्यात येतील.

१०. सदरची नामतालिका दि. ०१/०१/२०२० पासून अंमलात येऊन दि. ३१/१२/२०२२ पर्यंत वैध असेल, सदरच्या मुदतीनंतर नामतालिकेस मुदतवाढ देण्याबाबत किंवा नव्याने नामतालिका तयार करण्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधीकरणास आहेत.

११. नामतालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या उमेदवारास सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाचे निवडणूकांबाबतचे प्राधीकरणामार्फत आयोजीत प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे.

१२. नामतालिकेमध्ये समाविष्ट करावयाचा उमेदवार हा किमान पदवीधर असणे अनिवार्य आहे. संबंधीताने त्याबाबतचा पुरावा छायांकीत प्रतीमध्ये स्वसाक्षांकीत करून अर्जासोबत सादर करणे अनिवार्य राहील.

१३. नामतालिकेमध्ये समाविष्ट करावयाचा उमेदवार हा ज्या जिल्हयामध्ये नामतालिकेवर समाविष्ट होऊ इच्छितो त्या जिल्हयातील नियमीत रहिवाशी असावा. तो त्या जिल्हयातील रहिवाशी असलेबाबत त्याने अर्जासोबत आधारकार्ड / पॅनकार्ड / रेशनकार्ड/ मतदार ओळखपत्र / अदयावत वीजदेयक इ. पैकी एक पुरावा छायांकीत प्रतीमध्ये स्वाक्षांकीत करून सादर करणे अनिवार्य राहील.

१४. नामतालिकेमध्ये समाविष्ट करावयाचा उमेदवाराने एकाच जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करावा. एकापेक्षा जास्त जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करु नयेत.

उक्त 'क' व 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी निवडणूक नियम, सहकार कायदा व त्याखालील नियमाचे पुरेसे ज्ञान असलेले व अनुभवी अधिकारी / कर्मचारी यांचा समावेश नामतालिकेत असावा. तसेच अशा व्यक्तीकडून विहीत नमुन्यातील अर्जासह या सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील स्वसाक्षांकीत छायांकीत प्रतीमध्ये पुरावे जोडलेला अर्ज व रुपये १००/- किंमतीच्या स्टॅम्प पेपर वरील प्रतिज्ञा पत्र घेणे, प्राप्त अर्जांची काटेकोर पणे छाननी करणे व छाननी अंती निवडणूक घेण्यास पात्र व्यक्तीचा 'क' व 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नामतालिकेत समावेश करण्यात यावा व प्राधिकरणाच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव विहीत केलेल्या कालमर्यादेत सादर करावा.

प्राधिकरणाचे स्तरावरुन पॅनलबाबतच्या अटीशर्ती व विहितनमुन्यातील अर्ज मा. सहकार आयुक्तांचे संकेस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. तसेच याबाबतची जाहिरातही राज्य स्तरावरील वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात येणार आहे. सबब जिल्हा उपनिबंधक स्तरावरुन स्वंतत्रपणे जाहिरात देण्याची आवश्यकता नाही. तथापी अर्जदाराने संबंधित जिल्हयाच्या जिल्हा उपनिबंधकांकडेच पॅनलसाठी अर्ज सादर करणे आवश्यक आहे. प्राधिकरणाकडे अर्जदाराने थेट अर्ज सादर केल्यास असे अर्ज स्विकारले जाणार नाहित.

सदर निवडणूक निर्णय अधिकारी यांचा विहित नमुन्यातील अर्ज व रुपये १००/- किंमतीच्या स्टॅप पेपर वरील प्रतिज्ञा पत्र संबंधीत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या दप्तरी ठेवण्यात यावे. वरील सर्व बाबीची पूर्तता करुन आपल्या जिल्हयाचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या मान्यतेस्तव विहीत केलेल्या कालमर्यादेत सादर करावा.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशाने.**

०२/१२/१८

(यशवंत गिरी)

**सचिव**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,

महाराष्ट्र राज्य, पुणे

दि.   /   /२०१९

| नजीकच्या काळातील पासपोर्ट फोटो |
|---|

प्रति,

मा. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, .............

**विषय :- "क" व "ड" वर्गातील सहकारी संस्थांचे निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांचे नामतालिकासाठी अर्ज सादर करणेबाबत ...**

**महोदय,**

मी सहकार खात्यातील सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी, इतर शासकीय विभागातील / स्थानिक स्वराज्य संस्थेतील सेवानिवृत्त/ कार्यरत अधिकारी / कर्मचारी, वकील / प्रमाणीत लेखापरीक्षक / सहकारी संस्थेतील कार्यरत / सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी असून आपणांस याव्दारे विनंती करतो / करते की, आपल्या जिल्हयातील "क" व "ड" वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूका **(२५० किंवा त्यापेक्षा कमी सभासद असणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्था वगळून)** घेण्याची कार्यवाही पार पाडण्याकरीता निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांची नामतालिका तयार करण्याबाबतची जाहिरात प्राधिकरणाने प्रसिध्द केलेली आहे,

त्यास अनुसरून मी सहकारी संस्थांच्या निवडणूकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी म्हणून कामकाज करण्यास इच्छुक असून मला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारित तरतूदी ज्ञात आहेत.

**माझी वैयक्तिक माहिती खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र | विषय | तपशिल |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | संपूर्ण नाव :- मराठी<br>इंग्रजी | |
| २ | संपूर्ण पत्ता :- निवास<br>कार्यालय | |
| ३ | जन्म दिनांक - | |
| ४ | शैक्षणिक अर्हता / पात्रता - | |
| ५ | दुरध्वनी / मोबाईल नंबर - | |
| ६ | ई-मेल आय डी - | |
| ७ | निवृत्त असल्यास -<br>१. संस्थेचे / कार्यालयाचे नाव<br>२. निवृत्तीचे वेळी धारण केलेले पद<br>३. सेवा निवृत्तीचा दिनांक | |
| ८ | वकील असल्यास बार कौन्सिलचे छायांकीत व स्वसाक्षांकीत प्रमाणपत्र - | |
| ९ | प्रमाणीत लेखापरीक्षक असल्यास पॅनल नंबर - | |
| १० | अनुभव असल्यास अनुभवाच्या दाखल्याची मूळ प्रत जोडण्यात यावी. | |
| ११ | आधार कार्ड क्रमांक - | |

मी वरील प्रमाणे सादर केलेली सर्व माहिती सत्य असून याबाबतचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सोबत जोडले आहे. निवडीचे कोणत्याही टप्प्यावर मी सादर केलेली माहिती चुकीची किंवा खोटी किंवा बनावट असल्याचे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे निदर्शनास आल्यास त्याबाबत माझे विरूध्द वैधानिक कारवाई होऊ शकते याची मला जाणीव आहे. तरी माझ्या अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार करून मला सहकारी संस्थांच्या निवडणूकीचे निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी म्हणून नामतालिकेत माझे नांव समाविष्ट करण्यात यावे ही विंनती.

**आपला / आपली विश्वासू**

( **नाव व सही** )

**विहित नमुना**

| अ.क्र | संस्थेचे नाव व पत्ता | संस्थेचे वर्गीकरण | निवडणूक घेतलेला दिनांक | संचालक मंडळाचा निवडणूक कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

**सही /-**

**(नाव : -------------------------------)**

**दिनांक :-**

**ठिकाण :-**

# प्रतिज्ञापत्र

**(रु. १००/- स्टॅम्प पेपर व नोटरी करणे आवश्यक)**

मी, श्री/श्रीमती/सौ.----------------------------------------------------------------------वय ----------

वर्षे राहणार ------------------------------------------------------------------------------------------ सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो / देते की, मी सहकार खात्यातील सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी, इतर शासकीय विभागातील/ स्थानिक स्वराज्य संस्थेतील कार्यरत / सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी, वकील / प्रमाणीत लेखापरीक्षक / सहकारी संस्थेतील कार्यरत / सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी असून आपणांस याव्दारे विंनती करतो / करते की, आपल्या जिल्हयातील सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्याची कार्यवाही वेळोवेळी पार पाडण्यात येते. मी सहकारी संस्थांच्या निवडणूकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी म्हणून कामकाज करण्यास इच्छुक असून मला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, त्याखालील नियम १९६१, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारित तरतूदी ज्ञात आहेत. मी प्राधिकरण स्थापनेनंतर सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे सहकारी संस्थांच्या निवडणूकीचे निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी म्हणून कामकाज पुर्ण केलेले / पाहिलेले आहे. (असल्यास सोबतच्या नमुन्यातील स्वत्रंत यादी सादर करावी)

मी, असेही प्रतिज्ञेवर लिहुन देतो / देते की, सहकारी संस्थांच्या निवडणूकीचे कामकाज करतांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, त्याखालील नियम १९६१, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारित तरतूदी नुसार निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी म्हणून कामकाज करीन व सदरचे कामकाज करतांना कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार, भेदभाव, कायदा, नियम किंवा निवडणूक नियमावलीचे उल्लघंन करणार नाही. माझ्याकडून सहकारी संस्थांच्या निवडणूकीचे कामकाज करतांना कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार, भेदभाव, संस्थेचे आर्थिक नुकसान किंवा कायदा, नियम, तसेच निवडणूक नियमावलीचे उल्लंघन झाल्यास त्यास मी सर्वस्वी जबाबदार राहीन व मी कायदेशीर कारवाईस पात्र राहीन.

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, यापूर्वी सहकारी संस्थांची निवडणूक घेत असतानां कोणत्याही नियमाचे उल्लघंन माझ्याकडून झालेले नसून त्याबाबत माझेवर कोणतीही वैधानीक कारवाई करण्यात आलेली नसून मला यापूर्वीच्या तालिकेवरून कमी केलेले नाही.

**सही /-**

**(नाव : ------------------------------)**

**दिनांक :-**

**ठिकाण :-**

## "क" व "ड" वर्गातील सहकारी संस्थांचे निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांची नामतालिकाबाबत कार्यक्रम

| अ.क्र. | विषय | दिनांक | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | **जाहिरात प्रसिध्द करणे** | दि. ०६.१२.२०१९ | वर्तमान पत्र, मा. सहकार आयुक्त , वेबसाईट |
| २ | **विहित नमुन्यातील अर्ज व कागदपत्रे सादर करणे** | दि. ०७.१२.२०१९ ते दि. २१.१२.२०१९ (कार्यालयीन वेळेत ) | सर्व जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय |
| ३ | **प्राप्त अर्जाची छाननी करणे** | दि. २३.१२.२०१९ ते दि. २४.१२.२०१९ | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय |
| ४ | **पात्र निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांची नामतालिका यादी बनविणे** | दि. २६.१२.२०१९ ते दि. २७.१२.२०१९ | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय |
| ५ | **प्राधिकरणाकडे यादी सादर करणे** | ३१.१२.२०१९ | राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण , पुणे |

०२।१२।१९

( यशवंत गिरी )
**सचिव**
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे